Speed post

क्रमांक : [illegible]

महसूल व वन विभाग,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : ११/१/२००५.

प्रति,

प्रधान मुख्य वनसंरक्षक,
महाराष्ट्र राज्य, नागपूर.

विषय :- मा.उच्च न्यायालय, मुंबई, खंडपीठ, नागपूर यांनी दि. ७/२/२००२ रोजी दिलेल्या आदेशातील परिच्छेद ३६ (४) च्या अनुषंगाने संपूर्ण राज्यात आरागिरणी धोरणाची एकरुप अंमलबजावणी करण्याबाबत.

संदर्भ : १) शासनपत्र समक्रमांक दिनांक २१/५/२००३
२) मा. महाधिवक्ता यांचे पत्र क्र. एजी/३४८/२००४ दिनांक २७/५/२००४.

महोदय,

मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ , नागपूर यांनी रिट याचिका क्रमांक २६५२/२०० मध्ये दिनांक ७/२/२००२ रोजी दिलेल्या निर्णयास अनुलक्षून दि. १६/७/१९८१ नंतर राज्य शासना किंवा मुख्य वनसंरक्षक यांनी दिलेल्या परवान्याच्या आधारावर आरक्षित/संरक्षित वनसीमेपासून १ कि.मी. अंतराच्या आत स्थापित आरागिरण्यांबाबत मा.उच्च न्यायालयाच्या निर्देशाच्या आधारावर का कार्यवाही करावी लागेल याबाबत विधी व न्याय विभागाकडे त्यांच्या सल्ल्यासाठी विनंती करण्य आली. तथापि जोपर्यंत त्या विभागाचा सल्ला प्राप्त होत नाही तोपर्यंत अशा वर्गात येणा- आरागिरण्यांबाबत आरागिरणी धोरणाची एकरुपी अंमलबजावणी करण्याकरिता Status-Qu maintain करण्याबाबत सर्व संबंधितांना निदेश देण्याबाबत संदर्भिय दिनांक २१/५/२००३ च पत्रान्वये प्रधान मुख्य वनसंरक्षक, महाराष्ट्र राज्य, नागपूर यांना कळविण्यात आले आहे.

२. विधी व न्याय विभागाकडून प्राप्त झालेल्या सल्ल्याप्रमाणे मा.महाअधिवक्ता महार राज्य, नागपूर यांच्याकडून दिनांक ३१ जानेवारी, २००४ च्या पत्रान्वये यासंदर्भातील त्यांचे अभिप्रा शासनास देण्याबाबत त्यांना विनंती करण्यात आली होती. सदर शासनपत्राच्या अनुषं मा.महाअधिवक्ता यांनी शासनाने उपस्थित केलेल्या खालील मुद्दयांच्या अनुषंगाने त्यांचे अभि शासनास दिलेले आहेत.

मुद्दा क्रमांक १ :-

1) Can the saw mills which came into existence after 1981, by way of n licences, given by either C.C.F. Or Government after relaxing the r under the powers vested by Notification dated 19/8/1981 and 1/8/1982 termed as having come in existence in contravention of rules ?

अभिप्राय :-

Yes. - The observations of the Hon ble High Court are that the Forest Department could not permit any Saw Mill on or after 16 th July, 1981 within the radius of 10 Kms. Of the reserved/protected forest. Therefore, the question of relaxation does not arise.

मुद्दा क्रमांक 2 :-

Whether these saw mills are eligible for protection, under the modified order of the High Court dated 7/2/2002 or are required to be shifted beyond 10 Kms. from reserved Forest/protected forest in accordance with the original order of Hon ble High Court passed on 16/7/2001.

अभिप्राय :-

The Question of permission does not arise. They would be required to be shifted as per the Order dated 16th July, 1981

मुद्दा क्रमांक 3 :-

Whether all the licenses issued by any authority after 1981 other than Government and C.C.F. Are liable to be revoked.

अभिप्राय :-

Yes. But after complying the principles of natural justice.

मा.महाधिवक्ता यांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या अनुषंगाने या वर्गवारीत येणा-या आरागिरण्यांसंदर्भात खालीलप्रमाणे कार्यवाही करण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे.

१) दि. १६/७/१९८१ नंतर शासनाने किंवा मुख्य वनसंरक्षक यांनी दि. १९/८/१९८१ व १/८/१९८२ च्या अधिसूचनेखालील आरक्षित व संरक्षित वनसीमेच्या १० कि.मी. अंतराच्या आत ज्या आरागिरण्यांना परवाना देण्यात आलेला आहे त्या आरागिरण्यांना आरक्षित व संरक्षित वनसीमेपासून १० कि.मी. अंतराच्या बाहेर हलविण्यात यावे.

(२) दि. १६/७/१९८१ नंतर परवाना प्राप्त आरागिरण्या जोपर्यंत १० कि.मी. वनक्षेत्राच्या बाहेर जात नाहीत तोपर्यंत त्यांच्या परवान्याचे नूतनीकरण करण्यात येऊ नये

३) शासन किंवा मुख्य वनसंरक्षक यांच्याव्यतिरिक्त इतर काही अधिका-यांनी दि. १६/७/१९८१ नंतर ज्या आरागिरण्यांना परवाने दिले आहेत त्यांचे परवाने निरस्त करण्यात यावेत, परंतु असे परवाने निरस्त करण्यापूर्वी नैसर्गिक न्यायाच्या तत्त्वाचे पालन करणे आवश्यक आहे.

(आ.दि.आष्टेकर)
सहसचिव (वने).
महसूल व वन विभाग.